# महाराष्ट्र विधानसभा

**पाचवे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ३८, रूपये:- ८,१४,६४,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | ९ | १० | उमरेड,भिवापूर, कुही या तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी यांनी मोठ्या संख्येने पीकविमा भरलेला असणे, परंतु सदरील पीक विमा कंपन्या यांनी शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा दिलेला नसणे, तसेच शासनाने लाभार्थी किंवा पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना विमा तात्काळ मिळावा यासाठी कोणत्याही उपाययोजना केल्या नसणे, सदर पीक विमा कंपन्यांना शासनाकडून आदेश दिले नसल्यामुळे विमा कंपन्या मनमानी पद्धतीने काम करीत असणे, त्यामुळे शेतकरी पीक विमा पासून वंचित राहणे, याबाबत शासनाने पीक विमा कंपन्या यांच्या वर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना पीक विम्याची आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाायोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४४, रूपये:- १२,५४,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (२) | २९ | १०० | उमरेड, कुहीं, भिवापूर जि. नागपूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कोणत्याही सुविधा मिळत नसल्याने शेतकरी, नागरिक पशुपालक यांना अत्यंत अडचणीचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने तातडीने निधी व चांगल्या सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४७, रूपये:- ७,५०,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (३) | २० | १० | कडेगांव येथिल पशुवैद्यकीय दवाखाना इमारत व निवासस्थान इमारत खुप जुनी असुन पुर्णपणे जिर्ण व मोडकळीस अवस्थेत असणे, त्याठिकाणी नूतन पशुवैद्यकीय दवाखाना व निवासस्थान इमारत बांधकाम करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (४) | ५ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पशुवैद्यकिय दवाखान्याच्या स्वतंत्र ईमारती उपलब्ध नसणे, पशुवैद्यकिय व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, त्यामुळे जनावरांवर रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यास अडचण निर्माण होणे, पशुपालकांच्या दारात जनावरांना सखोल वैद्यकीय सेवा मिळावी आणि पशुपालकांमध्ये पशुसंवर्धनाबाबत जागरुकता वाढावी, जनावरांचे आजार ओळखावेत आणि लसीकरण व्हावे यासाठी गावपातळीवर पशु आरोग्य शिबिरांचे आयोजन न होणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात अत्याधुनिक मत्स्य बिज केंद्र व प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील मश्चिमार बांधव हे विविध योजनेंपासून वंचित असणे, तालुका स्तरावर शासकीय दुग्ध संकलन केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १८ डिसेंबर, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.